**कायम विना अनुदान तत्वावरील प्राथमिक शाळा परवानगीचे आदेश:**

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: नप्राशा-२७०६/(१०२/२००६)/प्राशि -३
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :१६ मे, २००६.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई, कोल्हापूर, नाशिक,औरंगाबाद, लातूर, नागपूर, अमरावती.

**विषय : सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त (मराठी व इतर माध्यमाच्या) खाजगी प्राथमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात नविन प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ३२३ (तीनशे तेवीस ) शैक्षणिक संस्थांना तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त (मराठी,हिंदी,उर्दू, गुजराथी ). सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास " जून २००५" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे. परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेकडून रु.२०/- एवढया रकमेच्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही, असे हमी पत्र संस्थेकडून प्रथम लिहून घ्यावे. सदरहू हमीपत्र आपल्या कार्यालयातील संबंधीत नस्तीवर कायम स्वरुपी जतन करुन ठेवावे व त्याच्या प्रती प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात. त्याची प्रत शासनासही माहितीस्तव सादर करावी.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र क्र.व्हीएलएस १०००/(५५७/२०००)(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या

मुख्याध्यापक
सन-ब्राईट प्राथमिक विद्यालय
आंबेगाव (बु.) पुणे-४६

अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ सदर शासनपत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००६०५१६२१०९०६००१ असा आहे.

(भि.य. मंता)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

मुख्याध्यापक
सन-ब्राईट प्राथमिक विद्यालय
आंबेगाव (बु.) पुणे-४६

शासन पत्र क्रमांक नप्राशा-१७०६/(१०२/०६)/प्राशि-३,दिनांक : १६ मे, २००६ चे सहपत्र
सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदानित मराठी व उर्दू माध्यमाच्या परवानगी द्यावयाच्या प्राथमिक शाळांची नांवे.

## जिल्हा - पुणे

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | पश्चिम महाराष्ट्र एज्युकेशन ट्रस्ट, ९९२, रविवार पेठ, पुणे | मिठानगर,पुणे | उर्दू | १ ली |
| २ | क्रांती शिक्षण प्रसारक मंडळ, अहमदपूर,जि.लातूर | कोंढवा, पुणे | उर्दू | १ ली |
| ३ | सेंट कृष्णा शिक्षण संस्था, ५६/२, ममता हौसिंग सोसायटी पुण्यनगरी समोर, वडगांवशेरी, पुणे | मुढवा रोड,पुणे | उर्दू | १.ली४ |
| ४ | भारतीय युवक कल्याण व व्यापारी केंद्र, गल्ली न. ३, कर्वेनगर, पुणे | पुणे | मराठी | १ ली |
| ५ | कै.नानाभाऊ गेनभाऊ बराटे शैक्षणिक विश्वस्त व्यवस्था, गल्ली ४, कॅनॉल खाली, कर्वेनगर, पुणे ५२ | पुणे | मराठी | १ ली |
| ६ | जय अंबिका मजूर सुरक्षा सेवा, स.न. ३१९,लोणीकंद ता.हवेली,जि.पुणे | खराडी | मराठी | १ ली |
| ७ | सुभाष अण्णा कुल शिक्षण प्रसारक मंडळ, राहू, ता.दौंड,जि.पुणे | शांतीनगर,खराडी,पुणे | मराठी | १ ली |
| ८ | अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, पर्वती, पुणे-९ | पुणे | मराठी | १ ली |
| ९ | सदानंद एज्युकेशन संस्था,धानोरी,पुणे | गोकुळनगर,धानोरी, पुणे | मराठी | १ ली |
| १० | यशश्री शिक्षण संस्कार प्रतिष्ठान सर्व नं. ३६/१५,२२२ वनराई कॉलनी,धनकवडी,पुणे | पुणे | मराठी | १ ली |
| ११ | हुतात्मा राजगुरु एज्युकेशन सोसायटी, चाकण | महात्मा फुले चौक, चाकण,ता.खेड | मराठी | १ ली |
| १२ | श्री. साई लोकसेवा प्रतिष्ठान प्रतिनिवास बी ४८, इंद्रप्रसथ चाकण, ता.खेड, जि. पुणे | चाकण, ता.खेड | हिंदी | १ ली |
| १३ | इंदापूर शिक्षण प्रसारक मंडळ, इंदापूर, जि.पुणे | इंदापूर | मराठी | १ ली |
| १४ | कै. विठ्ठलराव बेलदरे पाटील ज्ञानप्रसारक संस्था, प्रा.विद्यालय,आंबेगांव बु.ता. हवेली,पुणे | आंबेगांव बु. ता. हवेली,जि.पुणे | मराठी | १ ली |
| १५ | फ्रेंडस एज्युकेशन इन्स्टिटयूट, कोरेगांव भिमा, ता.शिरुर | कोरेगांव, भिमा, ता. शिरुर | मराठी | १ ली |

मुख्याध्यापक
सन-ब्राईट प्राथमिक विद्यालय
आंबेगाव (बु.) पुणे-४६